आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ / बचाव कार्य पूर्ण
- शेतकऱ्यांच्या मेहनतीला किंमत न देणाऱ्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नसल्याची शरद पवार यांची टीका
- शेवटच्या तासात झालेल्या खरेदीमुळं मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७७ अंकांची वाढ

**आणि**

- येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी गारपीट आणि मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ झाली आहे. काल रात्री एका वाहनात आणखी दोन मृतदेह आढळले. याठिकाणचं बचाव कार्य पूर्ण झालं असून आज दिवसभरात राडारोडा हटवला जाईल, अशी माहिती मुंबईचे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आज दिली. याठिकाणचे इतर ३ विनापरवाना फलक काढायचं काम सुरू आहे. मुंबई शहरातल्या इतर अशाच फलकांची तपासणी सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ मे २०२४ - गुरुवार

**<><><><>**

ठाणे महापालिका क्षेत्रातल्या सगळ्या होर्डिंग्जचे आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिट करायचे आदेश महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहेत. जाहिरात विभागाला महापालिका क्षेत्रातील अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंगचे सर्वेक्षण करुन तात्काळ कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत.

**<><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या सर्व शहरामधील आणि ग्रामीण भागातल्या होर्डिंगचं सर्वेक्षण करण्याचा आणि धोकादायक होर्डिंग तातडीनं हटवण्यच्या सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिल्या.  ते आज  हिंगोलीतल्या पावसाळापूर्व तयारीची बेठक झाली यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी पूरस्थितीचा सामना, इतर आपत्कालीन स्थितीच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.

**<><><><>**

शेतकऱ्यांच्या मेहनतीला किंमत न देणाऱ्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. धुळे लोकसभा मतदारसंघातल्या सटाणा इथं प्रचारसभेत ते बोलत होते.

धुळे, नाशिक, सातारा, पुणे या सर्व भागात शेतकर्यांच्या  कांद्याचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या मालाला चांगले भाव मिळत नाही. तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नाशिकच्या सभेत याविषयावर फार बोलले नाही, असं ते म्हणाले. चीनकडून सीमाभागात होत असलेल्या आक्रमकतेला केंद्र सरकार प्रत्युत्तर देत नाही. त्यामुळं परिस्थिती बदलायची असेल तर भाजपाचा पराभव करणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले. शेतकर्यांना  शेतीकामासाठी, शेती उत्पादनासाठी लागणार्या  सर्व वस्तू करमुक्त करणार असल्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिलं. भाजपाला पराभव दिसू लागल्याने नरेंद्र

मोदींची भाषणे भरकटू लागले आहेत, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

<><><><><>

ठाणे लोकसभा मतदार संघातले शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के, आणि कल्याण लोकसभा मतदार संघातले शिवसेनेचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी आज निवडणूक जाहीरनामा प्रकाशित केला. नरेश म्हस्के यांनी त्यांचा `नमो नम: वचननामा' ठाण्यात महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रकाशित केला. `वचन विकासाचे, ठाण्याच्या प्रगतीचे' अशा शीर्षकाखाली म्हस्के यांनी ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या येत्या पाच वर्षात करेल्या जाणाऱ्या विविध विकासकामांचा संकल्प या वाचनाम्यात मांडला आहे.  त्यात मनोरुग्णालयाच्या जागी नवीन रेल्वे स्थानक, नवी मुंबईत एम्सच्या धर्तीवर सुसज्ज रुग्णालय, जलवाहतुकीला प्रोत्साहन इत्यादी मुद्यांवर भर दिला आहे.

तर श्रीकांत शिंदे यांनी रेल्वेवर अधिक लक्ष, कल्याण ते ठाणे किनारी रस्त्याची उभारणी, रस्त्यांचं डांबरीकरण, मेट्रो, उन्नतमार्ग, उड्डाणपूल, पार्किंग सुविधा यांच्यावर आपल्या वचननाम्यात भर दिला आहे. गेल्या दहा वर्षात ९० टक्के काम केलं आहे. आता पुढच्या पाच वर्षांसाठी नवा संकल्प केला आहे, असं श्रीकांत शिंदे यांनी यावेळी घेतलेल्या वार्ताहर परिषदेत सांगितलं.

<><><><><>

धुळे लोकसभा मतदारसंघातल्या मतदारांना सर्व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिले. निवडणुकी तयारीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रत्येक मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांसाठी रॅम्पची व्यवस्था, मतदारांसाठी शेड, मेडीकल कीटची, मतदार सहाय्यता केंद्राची व्यवस्था करावी. मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी मतदार चिठ्ठी, मतदार

मार्गदर्शिका पुस्तिका तसेच अंध दिव्यांगासाठी ब्रेललिपी वोटर स्लिप मतदारांपर्यंत वेळेत पोहोचतील याची दक्षता घ्यावी, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी दिसून आली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७७ अंकांची वाढ झाली, आणि तो ७३ हजार ६६४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २०३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ४०४ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्याच्या नायगाव तालुक्यातल्या लालवंडी गावात एका धार्मिक कार्यक्रमातल्या सामूहिक जेवणानंतर दीडशे जणांना विषबाधा झाली. रुग्णांना नायगावच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यापैकी १३ जणांची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना नांदेडच्या जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

माजी आमदार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक विश्वास गांगुर्डे यांचं आज पहाटे पुण्यात अल्पशा आजारांनं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. १९७८ मध्ये सर्वप्रथम ते दत्तवाडी-राजेंद्रनगर प्रभागातून आणि नंतर १९९२ मध्ये गणेशखिंड प्रभागातून पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. १९९९ मध्ये पर्वती विधानसभा मतदारसंघातून ते आमदार झाले होते. महामॅंगो या राज्य शासनाच्या संस्थेचे ते काही काळ अध्यक्ष होते.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्याच्या शिंदखेडा तालुक्यातील गोराणे येथील शहीद जवान कमलेश ज्ञानेश्वर कदम यांच्या पार्थिवावर आज महिंदळे गावात लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना आंध्रप्रदेशात कर्तव्यावर असताना वीरमरण

आलं होतं. ते अरुणाचल प्रदेशातील शेरगाव इथं ७३ बटालियन सशस्त्र सीमा दलात कार्यरत होते. सध्या लोकसभा निवडणूकीच्या बंदोबस्तावर असतांना त्यांना आंध्र प्रदेशातल्या कडप्पा इथं वीरमरण आलं.

**<><><><><>**

राज्याच्या काही भागात आज अवकाळी पावसानं हजेरी लावली.लातूर शहर आणि परिसरात आज दुपारी वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या. लातूर जिल्ह्यातही काही ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली. हवामान विभागानं लातूर जिल्ह्याला 'यलो अलर्ट' जारी केला असून ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**सांगली** जिल्ह्यातही काही ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्याच्या काही भागातही आज वादळी वाऱ्यांसह अवकाळी पाऊस झाला. दुपारी झालेला मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे कणकवली तालुक्यात अनेक ठिकाणी घरं आणि झाडांचं नुकसान झालं.

**बुलढाणा** जिल्ह्यातल्या खामगाव शेगाव चिखली मेहकर, जळगाव, सिंदखेड राजासह अनेक भागात अवकाळी पावसानं हजेरी लावली.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'दक्षिण मध्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या आगामी पाचव्या टप्प्याच्या तयारीच्या अनुषंगानं देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचं निवडणूक विषयक कर्मचाऱ्यांना झालेलं आकलन ऑनलाईन परीक्षेच्या माध्यमातून तपासण्यात आलं. दहिसर विधानसभा

मतदारसंघात पार पडलेल्या निवडणूक विषयक अधिकाऱ्यांच्या दुसऱ्या प्रशिक्षण सत्रात एकंदर १ हजार ३शे ३३ अधिकाऱ्यांचं  प्रशिक्षण झालं.

**<><><><><>**

निवडणूक आयोगाच्या स्थिर सर्वेक्षण पथकानं काल कल्याण रेल्वे स्थानकातून  संशयास्पद रोकड जप्त केली. सामानाची तपासणी करताना एकाकडे सात लाख रुपयांची रोख रक्कम आढळली. त्याला या रकमेविषयी योग्य माहिती किंवा पुराव्याबाबत कागदपत्र देता आली नाहीत. ही रोकड जप्त केल्याची माहिती सर्वेक्षण पथक प्रमुखानी दिली.

**<><><><><>**

१६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यु दिवस म्हणून साजरा होतो. या निमित्तानं पालघर जिल्ह्यात आज विविध कार्यक्रमांचं आणि स्पर्धांचं आयोजन केलं होतं. वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे  राज्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य कर्मचारी, ए.एन.एम, आशा आणि औषध फवारणी कर्मचारी यांनी जनजागृतीपर प्रभातफेरी काढली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि साथरोग अधिकारी यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांची सभा घेऊन डेंग्यूबाबत मार्गदर्शन केलं तसंच डेंग्यूबाबत माहिती देण्यासाठी गटसभा आयोजित केल्या होत्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, गारपीट तसंच प्रतितास ५० ते ६० कि.मी. वेगवान वारे आणि मुसळधार पावसाची शक्यता  हवामान विभागानं वर्तवली आहे

उत्तर कोकणातल्या तुरळक भागातउष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे तर तुरळक भागात उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता आहे.